# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते. मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १७१ वा मंगळवार दि.०५ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


## एकनाथ शिंदे मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ पूर्ण करतील, प्रकाश आंबेडकरांचा दावा

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या विरोधात अपात्रतेची सुनावणी सुरू असली तरीही एकनाथ शिंदे हेच २०२४पर्यंत मुख्यमंत्रिपदी कायम राहतील आणि ते आपला कार्यकाळ पूर्ण करतील, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी केला आहे. पाच राज्यांच्या निवडणुकीत भाजपाने चांगला विजय संपादन केला आहे. भाजपाचा विजय हे सत्य आता स्वीकारायला पाहिजे, असेही ते म्हणाले.

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने तीन राज्यांत विजय मिळविला. याबद्दल आंबेडकर म्हणाले, भाजपचा विजय झाला आहे. पण त्यांचा विजय का झाला आणि कसा झाला, याचे बारकावे आल्यानंतर यावर भाष्य करता येईल. अजूनही केंद्रीय निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाइटवर संपूर्ण माहिती दिलेली नाही. पण या निवडणुकीत भाजपाचे पतन होईल, असे बोलले जात होते. ते वस्तुस्थितीला धरून नव्हते. काँग्रेसने कर्नाटकातील विजयाचा धडा लक्षात घेतला नाही. फक्त यश डोक्यात ठेवले, अशी टिप्पणी प्रकाश आंबेडकर यांनी केली.

तीन राज्यातील पराभवामुळे इंडिया आघाडीत काँग्रेसची वाटाघाटी करण्याची ताकद कमी होईल का? या प्रश्नावर, काँग्रेसची राजकीय युती फक्त राष्ट्रीय जनता दलाचे लालूप्रसाद यादव आणि जदयुच्या नितीश कुमार यांच्याबरोबर होती. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांच्याबरोबर युतीची चर्चा होणार होती. त्यामुळे काँग्रेसची ताकद कमी होईल असे म्हणता येणार नाही, असे आंबेडकर म्हणाले.

आम्ही अगोदरपासून इंडिया आघाडीत जाण्यास इच्छुक आहोत. आम्हाला इंडियामध्ये घ्या, असे आम्ही म्हणत आहोत. पण, आम्हाला घेण्यास कुणी तयार नाही. तरीही, आम्ही इंडिया आघाडीबरोबर जाण्यास तयार आहोत, असेही आंबेडकर यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

### ८ डिसेंबरला शांती सभा

इस्रायल आणि पॅलेस्टाईन या दोन देशांमध्ये सुरू असलेले युद्धाला पूर्णविराम मिळून दोन्ही देशांत शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी येत्या ८ डिसेंबरला सर्वधर्मीय शांती सभा आयोजित केल्याची माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

## 'पोस्ट ऑफिस बिल २०२३' आवाजी मतदानाने मंजूर




नवी दिल्ली : देशातील पोस्ट ऑफिसशी संबंधित कायद्यांचे एकत्रीकरण आणि सुधारणा करण्याच्या उद्देशाने आणलेले पोस्ट ऑफिस बिल, २०२३, राज्यसभेने सोमवारी आवाजी मतदानाने मंजूर केले. विधेयकाच्या वस्तू आणि कारणांमध्ये असे नमूद केले आहे की, भारतीय पोस्ट ऑफिस कायदा, १८९८ रद्द करणे आणि भारतातील पोस्ट ऑफिसशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण, सुधारणा करणे आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींची तरतूद करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.त्यात असे नमूद केले आहे की, भारतीय पोस्ट ऑफिस कायदा, १८९८ हा भारतातील पोस्ट ऑफिसच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी १८९८ मध्ये लागू करण्यात आला होता. हा कायदा मुख्यत्वे टपाल कार्यालयामार्फत पुरवल्या जाणाऱ्या मेल सेवेशी संबंधित आहे. या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांनी टपाल सेवेच्या खाजगीकरणाबाबत विरोधी सदस्यांची शंका फेटाळून लावली आणि हा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगितले.क्लाउड सेवांच्या खाजगीकरणासाठी विधेयकात कोणतीही तरतूद नाही किंवा सरकारचा असा कोणताही हेतू नाही.

## अरविंद पतसंस्थेचे चेअरमन रोहितराज दंडनाईक यांना जामीन मंजूर

धाराशिव : प्रतिनिधी शहरातील अरविंद नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रोहितराज दंडनाईक यांना न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. धाराशिव येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश किरण बागे पाटील यांनी शनिवारी दि. २ डिसेंबर रोजी काही अटीवर जामीन मंजूर केला आहे. पतसंस्थेचे संचालक संजय बोंदर यांनीही अटकपुर्व जामीनासाठी अर्ज दाखल केलेला असून या अर्जावर सोमवारी दि. ४ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.ठेवीदारांच्या ठेवी मुदत संपल्यानंतरही परत मिळत नसल्याने अरविंद पतसंस्थेचे ठेवीदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पतसंस्थेचे चेअरमन रोहितराज दंडनाईक, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ यांच्यावर १ सप्टेंबर २०२३ रोजी आनंदनगर पोलीस ठाण्यात विविध कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अरविंद पतसंस्थेच्या ठेवीदारांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात १० लाख रूपयांचा गुन्हा नोंद आहे. त्यापैकी ५० टक्के रक्कम रोहितराज दंडनाईक यांनी न्यायालयात जमा केली आहे.पोलीसांच्या तपासात हा आकडा साडेतीन कोटीच्या पुढे गेला आहे. शनिवारी दि. २ डिसेंबर रोजी न्यायाधीश किरण बागे पाटील यांनी चेअरमन रोहितराज दंडनाईक यांचा जामीन काही अटीवर मंजूर केला आहे. त्यामुळे श्री. दंडनाईक यांना दिलासा मिळाला आहे. सरकार पक्षाच्या वतीने शासकीय अभियोक्ता अ‍ॅड. शरद जाधवर यांनी तर श्री. दंडनाईक यांच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. मिलिंद पाटील यांनी बाजू मांडली.



## मध्य प्रदेशात 'भारत जोडो यात्रा' ठरली फेल? ज्या ठिकाणांहून गेली तिथं १७ जागा काँग्रेसनं गमावल्या!


नवी दिल्ली : विजयाची अपेक्षा असलेला मध्य प्रदेशातील निकाल विरुद्ध लागल्यानं काँग्रेसमध्ये निराशेचं वातावरण आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसनं ११४ जागा जिंकल्या होत्या. तर या निवडणुकीत ही संख्या ६६ वर थांबली. या राज्यात राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. पण ही यात्रा ज्या ज्या भागातून गेली तिथल्या तब्बल १७ जागा भाजपनं गमावल्या आहेत. ३८० किमीचा टप्पा या यात्रेत तब्बल ३८० किमीचा टप्पा पार केला होता. यामध्ये २१ विधानसभा मतदारसंघातून ही यात्रा गेली होती. पण रविवारी जेव्हा विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर आले तेव्हा काँग्रेसला मोठा झटका बसला. कारण ज्या २१ मतदारसंघातून भारत जोडो यात्रा



गेली तिथल्या १७ जागांवर भाजपनं विजय मिळवला आणि काँग्रेसला हार पत्करावी लागली.इंदूरमध्ये काँग्रेसला फटका राहुल गांधींची ही भारत जोडो यात्रा गेल्या वर्षी २३ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या काळात मध्य प्रदेशातील मालवा-निमाड भागातील सहा जिल्हे बुरहानपूर, खंडवा, खरगोन, इंदूर, उज्जैन आणि आगर मालवा इथून गेली. काँग्रेसनं या २१ जागांपैकी केवळ ४ जागांवर विजय मिळवला. इंदूर जिल्ह्यातील सर्व आठ मतदारसंघातून ही यात्रा गेली होती. पण इथल्या सर्वच्या सर्व जागा भाजपनं जिंकल्या. काँग्रेसनं गमावलं, भाजपनं कमावलं २०१८ च्या निवडणुकीत या २१ जागांपैकी १४ जागा भाजपनं जिंकल्या होत्या. तर ७ जागांवर काँग्रेसला विजय मिळाला होता. राहुल गांधींची भारत जोडो यात्रा काँग्रेससाठी आशादायी चित्र होतं. पण नेमकी परिस्थिती उलटली. उलट गेल्या निवडणुकीच्या तुलनेत काँग्रेसनं आणखी चार जागा गमावल्या. तर भाजपच्या चार जागा वाढल्या.

## आंदोलन यशस्वी, आता फक्त कायद्याची प्रतीक्षा

धुळे : कुणबी नोंदी शोधमोहिमेमुळे आतापर्यंत राज्यातील ३२ लाख मराठ्यांना आरक्षण मिळाले आहे. त्यामुळे आपले आंदोलन इथेच यशस्वी झाले आहे. आता केवळ त्याला कायद्याचा आधार हवा आहे. २४ डिसेंबरच्या आत मराठा समाजाला सरसकट कुणबी आरक्षण असेच आपले सरकारसोबत ठरले आहे.या मागणीसाठी जीव गेला तरी आपण एक इंचही मागे हटणार नाही, असा दृढनिश्चय मनोज जरांगे-पाटील यांनी येथे बोलून दाखविला. गावगाड्यातील ओबीसी समाज हा मराठा समाजासोबत असल्याचेही ते म्हणाले. नाव न घेता मंत्री छगन भुजबळ यांच्यावरही त्यांनी जोरदार टीका केली.मराठा समाजाला सरसकट कुणबी आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे पाटील यांची रविवारी (ता. ३) दुपारी तीनला धुळ्यात जेल रोडवर सभा झाली. धुळे जिल्हा सकल मराठा समाजातर्फे या सभेचे आयोजन करण्यात आले. जरांगे पाटील म्हणाले, की एकट्या जळगाव जिल्ह्यात तब्बल साडेतीन लाख कुणबी नोंदी सापडल्याची मला माहिती मिळाली.याचा अर्थ साडेसात लाख मराठा समाजबांधवांना आरक्षणाचा लाभ मिळाला. कुणबी नोंदी सापडल्यामुळे राज्यात आतापर्यंत ३२ लाख मराठ्यांना आरक्षण मिळाले आहे. त्यामुळे आपले आंदोलन इथेच यशस्वी झाले आहे. आता केवळ कायद्याची प्रतीक्षा आहे. एवढी वर्षे मराठा समाजाला जाणूनबुजून आरक्षणापासून दूर ठेवल्याचा आरोपही त्यांनी केला. आणखी किती बळी हवेत?मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अलीकडच्या काळात ६० पेक्षा जास्त आत्महत्या झाल्या, त्यापूर्वी ४२ आत्महत्या झाल्या. आणखी किती बळी सरकार घेणार आहे, असा सवाल श्री. जरांगे पाटील यांनी केला. माणुसकी जिवंत ठेवा, मुडदे पाडणे बंद करा. समाजासाठी शहीद होणे सोपे नाही, शहीद झालेल्या व्यक्तीच्या घरात डोकावून पाहा. समाजानेही अशा कुटुंबांना उघड्यावर सोडू नये, मदतीसाठी उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.ओबीसी मराठ्यांसोबत मंत्री भुजबळ यांचे नाव न घेता श्री. जरांगे पाटील यांनी भुजबळांना लक्ष केले. मराठ्यांना विरोध म्हणून काही जण विरोध करत आहेत. गावखेड्यातला ओबीसी समाज हा मराठ्यांसोबत असल्याचा दावाही जरांगे पाटील यांनी केला. ओबीसी-मराठा असा वाद निर्माण करून काही जणांचे दंगल घडविण्याचे स्वप्न आहे. मात्र, त्यांचे हे स्वप्न पूर्ण होऊ द्यायचे नाही, आम्हाला ते होऊ द्यायचे नाही.समाजालाही आवाहन ज्यांना आरक्षण आहे, त्यांनी आरक्षण नसलेल्या समाजबांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे. खानदेश व विदर्भातील मराठ्यांनी यासाठी उभे राहावे, महिलांनीही यासाठी जागृती करावी, असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. मराठा समाजासह इतर सर्व पक्षांतील प्रस्थापितांवरही त्यांनी निशाणा साधला.




## मोइत्रा यांच्या निलंबनाबाबतीचा अहवाल मंगळवारी मांडला जाणार

नवी दिल्ली : तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्या निलंबनाबाबतीचा आचार समितीचा अहवाल मंगळवारी लोकसभेत मांडला जाणार आहे. महुआ मोईत्रा यांच्या मुद्द्यावरून सोमवारी लोकसभेत प्रचंड गदारोळ झाला. या मुद्द्यावर सोमवारी चर्चेची मागणी विरोधी पक्षाच्या खासदारांनी केली. 'लाच घेऊन प्रश्न विचारल्या' प्रकरणी महुआ मोईत्रा यांची सभागृहातून निलंबन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. लोकसभा सचिवालयाने जारी केलेल्या अजेंड्यानुसार, आचार समितीचे अध्यक्ष विनोद कुमार सोनकर समितीचा अहवाल सभागृहात मांडणार आहेत. एथिक्स कमिटीच्या सदस्या अपराजिता सारंगी यांनी माध्यमांना सांगितले की, अध्यक्षांनी आम्हाला अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.



## सीमावर्ती भागांमध्ये काँग्रेसला कौल

मुंबई :लोकसभेची सेमीफायनल महाराष्ट्राच्या सीमेवरील तीन राज्यात प्रामुख्याने लढली गेली. त्यामुळे या राज्यातील निकालांचा महाराष्ट्रावर प्रत्यक्ष नव्हे, तर अप्रत्यक्ष राजकीय परिणाम नक्कीच होऊ शकतो. महाराष्ट्रातील सीमेवरील मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणाच्या जिल्ह्यांचा विचार केला, तर सीमावर्ती जिल्ह्यांमधील ६९ जागांपैकी भाजपपेक्षा काँग्रेसच वरचढ ठरली आहे. ६९ जागांपैकी ३४ जागांवर काँग्रेस तर ३१ जागांवर भाजपला विजय मिळालाय. तसेच तेलंगाना आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील ४ जागांवर भारत राष्ट्र समिती ही विजयी झालीये. यामुळे लोकसभेच्या सेमीफायनलमध्ये जरी भाजपने जोरदार विजय मिळवला असला, तरी महाराष्ट्राच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये काँग्रेसने भाजपला कडवी झुंज दिली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.लोकसभेची सेमीफायनल ही एकदंरीतरित्या भाजपला प्रचंड यश देणारी ठरली आहे. विशेष म्हणजे निवडणुक असलेल्या पाच पैकी मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा ही तिनही राज्य महाराष्ट्राच्या शेजारची असल्याने या निवडणूक निकालांचे महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम होतील हे नाकारता येणार नाही. त्याच त्याच दृष्टीने महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागातील निकालांची स्थिती काय राहिली आणि त्याचे महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात काय परिणाम होतील याचे विश्लेषण केले.महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेवरील आठ जिल्ह्यात एकूण ३८ विधानसभा क्षेत्र होते. त्यापैकी १८ जागा काँग्रेसकडे तर २० जागा भाजपकडे गेल्या आहेत. त्यामुळे मध्यप्रदेशमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाला असला तरी सीमावर्ती भागात काँग्रेसने भाजपला चांगली झुंज दिल्याचं पाहायला मिळाले. मात्र, मध्यप्रदेशातील महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये काँग्रेसचा यश प्रामुख्याने काँग्रेसचे दिग्गज नेते कमलनाथ यांच्या छिंदवाडा जिल्ह्यातून मिळाले आहे. छिंदवाडा जिल्ह्यातील सातही जागांवर काँग्रेसने विजय मिळवलाय. बैतूल, खंडवा, बुहूरानपूर या जिल्ह्यांमध्ये भाजपला एकहाती यश मिळाले आहे. तसेच खरगोन, सिवनी, बालाघाट आणि बडवाणी या जिल्ह्यात दोन्ही पक्षांना संमिश्र यश मिळाले आहे.दरम्यान, मध्यप्रदेशात दारुण पराभवामुळे कुठे तरी बॅकफूटवर गेलेली. पण सीमावर्ती भागात मिळालेल्या यशाने काही प्रमाणात काँग्रेसला दिलासा मिळाला असल्याचं चित्र आहे. मध्यप्रदेशाच्या सीमावर्ती भागात भाजपच्या अनेक दिग्गजना काँग्रेसने पराभूत केल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. तसेच राजकीय विश्लेषकांना महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील सीमावर्ती जिल्ह्यात काँग्रेसचा यश फक्त कमलनाथ त्या भागातील असल्यामुळेच मिळाले असल्याचे वाटत आहे.

छत्तीसगडमध्येही भाजपला मोठे बहुमत मिळाले असल्याचे पाहायला मिळाले. तरी मध्यप्रदेशासारखेच छत्तीसगडमध्येही सीमेवरील मतदारसंघात भाजपच्या तुलनेत काँग्रेसचे यश जास्त प्रभावी ठरले आहे. महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर राजनांदगाव, कांकेर, नारायणपूर आणि बिजापूर या चार जिल्ह्यांमधील १२ विधानसभा मतदारसंघात निवडणुका पार पडल्या. त्यामध्ये १२ पैकी ८ जागांवर विजय मिळवत काँग्रेसच वरचढ ठरली आहे.



## संपादकीय....

### तो ‘राम’ आम्हाला देतो रे..!

विजयाचे पितृत्व घेण्यास अनेक इच्छुक असतात; पण पराजय अनाथ आणि अनौरस असतो हे सत्य पाच राज्यांतील निवडणुकांचे निकाल पुसून टाकतात. यश गृहीत न धरता प्रचारात उतरून ‘रेवडी’चाही खुबीने वापर करणे, नाकारलेल्या नेत्यांनाही मतदारांचा कल पाहून अखेर स्थान देणे हे गुण भाजपला मोठा विजय देणारे ठरले.विजयाचे पितृत्व घेण्यास अनेक इच्छुक असतात; पण पराजय अनाथ आणि अनौरस असतो हे सत्य पाच राज्यांतील निवडणुकांचे निकाल पुसून टाकतात. या पाचपैकी मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणा या चार राज्यांतील मतमोजणी रविवारी झाली. आज, सोमवारी मिझोरामचा निकाल लागेल. या चार राज्यांच्या तुलनेत तो तितका महत्त्वाचा म्हणता येणार नाही. या चारपैकी तीन राज्ये भाजपने सहजी जिंकली आणि तेलंगणाने काँग्रेसला हात दिला. त्या दक्षिणी राज्यात भाजप नावापुरता होता. त्यामुळे तेथे लढाई दोन वेळचे सत्ताधीश, तेलंगणा राष्ट्रीय समितीचे के. चंद्रशेखर राव आणि काँग्रेस यांच्यातच होती. या राव यांस काँग्रेसने धूळ चारली. गेले वर्षभर या राव यांचा रथ चांगलाच उडत होता आणि त्यांस राष्ट्रीय नेतृत्वाची स्वप्ने पडू लागली होती. ती मातीमोल झाली ही आनंददायक बाब. हा आनंद दुहेरी आहे. याचे कारण म्हणजे हे असले राजकीय चक्रमवीर सर्व व्यवस्था कनवटीस लावून राजकारण करतात, ते त्यांचे राजकारण रोखले गेले, हे आनंदाचे एक कारण. आणि दुसरे म्हणजे त्या राज्यांत अटीतटीची लढत झाल्यास राव यांस टेकू देऊन आघाडी सरकार बनवण्याचा भाजपचा सुप्त हेतू धुळीस मिळाला. राव यांच्या विरोधात भाजप नमते घेऊ लागला होता आणि एरवी विरोधकांवर धडाडणाऱ्या सरकारी यंत्रणांच्या तोफा राव कुटुंबीयासमोर शांत झाल्या होत्या. काँग्रेसला कसेही करून सत्तेपासून दूर ठेवायचे या हेतूने तेलंगणात भाजपचे प्रयत्न होते. ते असफल ठरले. तथापि काँग्रेसचे हे तेलंगणातील घवघवीत यश भाजपच्या उत्तरेतील त्यापेक्षाही अधिक घवघवीत यशाखाली दबून जाणार हे निश्चित. उत्तरेतील राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांत अटीतटीची लढत होईल असे अपेक्षित होते. ती तशी अजिबात झाली नाही. भाजपने दोनतृतीयांशाचा पल्ला सहज पार केला. हे का झाले असावे? भाजपच्या यशाची प्रमुख कारणे तीन. एक म्हणजे पंतप्रधान यांचे नेतृत्व, गृहमंत्री अमित शहा यांचे अगदी मतदारसंघनिहाय व्यवस्थापन आणि या सर्वास रा. स्व. संघाची संघटनात्मक जोड. अर्थात हे सर्व असले तरी भाजप पराभूत होऊ शकतो हे कर्नाटक आणि अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या हिमाचलाने दाखवले होतेच. तसे या तीन राज्यांत झाले नाही याचे कारण या राज्यांत झालेली विविध केंद्रीय योजनांची अत्यंत प्रभावशाली अंमलबजावणी आणि ती करताना भाजपशासित राज्य सरकारने त्यात स्वत:ची घातलेली भर. उदाहरणार्थ मध्य प्रदेश. निवडणुकांच्या आधी एप्रिल महिन्यात मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ‘लाडली बहेना’ योजना आणली. यात गरीब महिलांना दरमहा १२५० रु. दिले जातात आणि ते सत्ता पुन्हा आल्यास तीन हजार रुपये करण्याचे शिवराज सिंह यांचे आश्वासन होते. त्याच्या जोडीला शेतकऱ्यांसाठी केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या वर्षांस सहा हजार रुपयांत चौहान यांचे सरकार स्वत:चे चार हजार रु. घालते. याचा अर्थ असा की त्या राज्यातील गरीब कुटुंबास वर्षांला काहीही न करता ४६ हजार रु. मिळतील. या अशा खिरापतीस पंतप्रधान मोदी भले ‘रेवडी’ असे म्हणाले असोत पण त्यांच्याच पक्षाच्या मध्य प्रदेश सरकारने अशी रेवडी वाटपाची उत्तम यंत्रणा उभी केली. याच्या जोडीला शिवराज सिंह चौहान यांचे साधे ‘मामा’रूप. या तीन घटकांचा इतका उत्तम मिलाफ मध्य प्रदेशात होता की केंद्रीय नेत्यांस प्रत्यक्षात नकोसे असले तरी अखेर शिवराज सिंह चौहान यांनाच पुढे करण्याची वेळ आली आणि त्यांनी अखेर अभूतपूर्व यश मिळवले. इतक्या मोठय़ा राज्यात तीन–चार वेळा सलग निवडून येणे सोपे नाही. हा विजय उत्तर प्रदेशच्या योगी आदित्यनाथ यांच्यापेक्षा चौहान यांस वरचे स्थान देणारा ठरतो.या राज्याच्या तुलनेत राजस्थानात भाजपची कामगिरी सोपी होती. सत्तेवर काँग्रेस असेल तर विरोधी पक्षाची भूमिका निभावणारा भाजप त्वेषात लढतो. शिवाय राजस्थानाचा सलग दुसरी खेप कोणत्याच पक्षास न देण्याचा लौकिक. त्यामुळे राजस्थानात भाजपस आव्हान हे काँग्रेसपेक्षा स्वपक्षीयांचेच अधिक होते. वसुंधराराजे यांस शेवटच्या टप्प्यापर्यंत तगवत ठेवून आणि शेवटी त्यांस नावापुरते जवळ करून भाजपने त्यावर मात केली. वसुंधराराजे फुरंगटून बसल्या असत्या तर गत खेपेप्रमाणे गेहलोत यांची लढाई सोपी झाली असती. त्याच वेळी त्यांच्या हाती निवडणुकीची सूत्रे दिली असती तर श्रेष्ठींस त्यांच्यासमोर कमीपणा पत्करावा लागल्याचे चित्र निर्माण झाले असते. यातून वसुंधराराजे शेफारण्याचा धोका होता. त्यामुळे भाजप नेतृत्वाने त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले नाही; पण त्यांना महत्त्वही दिले नाही. राजस्थानाचा विजय काठावरचा ठरला असता तर वसुंधराराजेंकडे नेतृत्व देण्याखेरीज दुसरा पर्याय भाजपसमोर राहिला नसता. तसे झाले नाही. आता वसुंधराराजेंस दूर ठेवून एखादा नवा चेहरा भाजप देऊ शकेल. या तुलनेत छत्तीसगडमधे मात्र लढत अटीतटीची झाल्याचे दिसते. निवडणुकीपूर्वी काँग्रेसचे भूपेंद्र बघेल हे सत्ता राखणार असे मानले जात होते. तसे काही झाले नाही. भाजप त्या राज्यातही यशस्वी ठरला. हे झाले भाजपचे.काँग्रेसच्या दृष्टीने पाहू गेल्यास त्या पक्षाने कर्नाटक विजय फारच गांभीर्याने घेतला असे म्हणता येईल. या एका राज्यातील विजयामुळे आता केंद्रातील सत्ताधाऱ्यांविरोधात वातावरण बदलत असल्याचे काँग्रेसला वाटले आणि तो पक्ष तुलनेने निश्चत बनला.

# ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल!.

राज्यभरात मराठा ओबीसी आरक्षणाची रणकंदन माजली आहे.मराठे आक्रमक होऊन त्यांच्या समाजाला जागृत करीत आहेत.त्यांची सरळ भूमिका आहे आम्हाला देणार नसाल तर सर्वांचे बंद करा.त्यासाठी खेड्यापाड्यातील ह.भ.प.कीर्तनातून प्रभावी प्रबोधन करीत आहेत.ते आपल्या दुष्टीने चुकीचे असले तरी त्यांच्या दुर्ष्टीने बरोबर आहे.ते राजकीयदृष्ट्या आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या गरीब नाहीत हे शंभर टक्के सत्य असले तरी ते स्वताला गरीब मागासवर्गीय ठरवून घेण्यासाठी जिव तोड मेहनत करीत आहेत.राज्यात असे एक ही गांव नाही की शहर नाही जिथे मराठा समाजाचे वर्चस्व नाही.तरी ते का पेटून उठले आहेत?.लायकी नसणारे त्यांच्या समोर शिक्षणामुळे विज्ञानवादी बनून बोलण्यात लिहण्यात आणि नेतृत्व करण्यास समर्थ ठरत आहेत.हेच सहन होत नाही.म्हणूनच हा आरक्षणाचा संघर्ष आहे. राज्यातील ५२ टक्के ओबीसी किती जागृत आहे.राज्यात किती किती ठिकाणी ओबीसी सुतार जागृती निर्माण करण्यासाठी ओबीसी सुतार समाजाचे वैचारिक परिषदा,परिसंवाद,व्याख्यान,जागृती मेळावे घेतल्या जात आहेत. राज्यात किती वेळा किती ओबीसी सुतार समाज इतर ओबीसी समाजाचे लोक उपस्थितीत असतात. यांचे आत्मचिंतन करून आत्म परीक्षण करणे आवश्यक आहे असे मला वाटते.यांची चिकित्सा व समीक्षा कधी तरी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे म्हणूनच मी म्हणतो ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल!.

आम्ही ओबीसी असल्याची ओळख प्रथम कोणी करून दिली.हे ओबीसी समाजातील बुद्धिजीवी विचारवंत कधीच सांगतांना दिसत नाही. म्हणून मी तो करून देण्याचा प्रयत्न करणार आहे.प्रथमच सांगतो मी बुद्धिजीवी विचारवंत नाही,मी समाजातील किर्याशील कार्यकर्ता आहे.पण शिवाजी महाराज,फुले,शाहू आंबेडकर विचारांच्या बुद्धिजीवी विचारवंतांचे साहित्यिकांचे लेख वाचून नेहमीच त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.आणि उलट सुलट चर्चा करतो तेव्हा हा ओबीसी चा इतिहास मला कळतो.म्हणूनच म्हणतो ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल!.

१९४६ साली विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ’शुद्र पूर्वी कोण होते..?’. हा ग्रंथ लिहिला.या ग्रंथाच्या माध्यमातून मनूच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील चौथ्या व सर्वात खालच्या वर्णाचा अर्थात शुद्रांचा (म्हणजे ओबिसींचा) इतिहास त्यांनी प्रथमच उजेडात आणला.‘थहे्शीश ीहश ड्ढीवीरी...?’(शुद्र पूर्वी कोण होते...?) हा ग्रंथ नुकताच डॉ.बाबासाहेबांनी लिहून पूर्ण केला होता आणि संविधानाच्या कामाला हात घातला होता.शुद्र समाजाच्या संदर्भात संशोधन करून स्वतंत्र पुस्तक लिहिले असल्याने शूद्रांचा प्रश्न बाबासाहेबांना अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा वाटत होता.प्रश्न सोडविण्यासाठी संविधानात आवश्यक त्या तरतुदी करता येऊ शकतील असा विश्वास बाबासाहेबांना होता.संविधान लिहित असतांना,ज्यावेळी आरक्षणाचा मुद्दा आला त्यावेळी बाबासाहेबांनी ’पहिल्यांदा’ ओबीसी समाजाचा विचार केला.ओबीसी समाजासाठी ३४० वे,अनुसूचित जातींसाठी ३४१ वे, अनुसूचित जमातींसाठी ३४२ वे कलम तयार केले.आणि ही सर्व कलमे घटना समिती मध्ये सविस्तर स्पष्टीकरण देऊन मंजूर करवून घेतली. यापैकी अनुसूचित जातीच्या ३४१ व्या व अनुसूचित जमातीच्या ३४२ व्या कलमाला फारसा विरोध झाला नाही. पण, ओबीसींसाठी तयार केलेल्या ३४० कलमाला मात्र प्रचंड विरोध झाला.ओबीसींसाठी डॉ.बाबासाहेबांनी स्वतंत्र कलम तयार केले आहे हे कळताच महात्मा गांधी,पंडित नेहरू,वल्लभभाई पटेल,राजेंद्र प्रसाद असे त्यावेळचे जवळजवळ सर्वच नेते नाराज झाले. कोण हे ओबीसी...?’’ असे वल्लभभाई पटेल स्वतः जइउ असूनही त्यांनी तुसडेपणाने बाबासाहेबांना विचारले होते.घटना समिती आणि संसदेतील ऊच्चवर्णीय सदस्यांनीच या कलमाविरुद्ध आवाज उठवला.परंतु,या विरोधाला डॉ.बाबासाहेबांनी त्यांच्या शिक्षण व अफाट माहितीच्या बळावर भिक घातली नाही.हे किती ओबीसी नेत्यांना माहिती आहे.आणि ज्यांना माहिती आहे त्यांनी कधी जाहीरपणे हे सत्य समाजाला का सांगितले नाही.मी तरी याबाबत कधीच चर्चा संवाद परिसंवाद व्याखान एकले नाही.

आज ओबीसीना तुम्ही हिंदू आहात हे पटवून दिल्या जाते.ते सर्व ओबीसी मान्य करून त्यांचं प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने भाग घेतात. मात्र ओबीसी कोण हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४६ ओबीसी कोण आहेत...? आणि ते मागास का राहिलेत...? हे पटवून दिले आणि त्यांच्यासाठी ३४० व्या कलमाची तरतूद मंजुर केली.अर्थात,घटनेत कलम घातले असले तरी या कलमाला असलेला उच्चवर्णीयांचा विरोध मावळला नाही तो नाहीच...!.स्वताला सुवर्ण समजणारे मराठे तेव्हा ही कट्टरपंथीय हिंदू म्हणून विरोधात होते आणि आणि आज ही गर्वसे कहो हम हिंदू है म्हणूनच विरोधात आहेत. घटनेतील ३४० या कलमानुसार देशात ओबीसी जाती नक्की किती व कोणत्या आहेत हे तपशीलवार शोधून काढणे आणि त्यांच्या मागासलेपणाचे कारण तपासून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिफारशी करणे यासाठी आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली.२६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू झाले.त्यानंतर लगेचच बाबासाहेबांनी ओबीसी आयोग स्थापन करण्याची मागणी केली.परंतु,तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी या मागणीकडे सतत दुर्लक्ष केले. टाळाटाळ केली.त्याच वेळी हिंदू कोड बिला संदर्भात बाबासाहेब काम करत होते आणि ते बिल लवकरात लवकर मंजूर करावे असा आग्रह धरत होते.ओबीसी व सर्व धर्मातील स्त्रिया या दोन मोठ्या लोकसमुहाच्या प्रश्नासंबंधीच्या बाबासाहेबांच्या मागणीला काँग्रेसचे पुढारी वाटाण्याच्या अक्षता लावत होते.

ओबीसी समाजाकडे पाहण्याचा सरकारचा उपेक्षेचा दृष्टीकोन तसेच हिंदू कोड बिल संमत न करून स्त्रियांच्या प्रश्नांबाबत दाखवलेली अक्षम्य उदासीनता याचा निषेध म्हणून अखेर २७ सप्टेंबर १९५१ रोजी बाबासाहेबांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला.या राजीनाम्याने एकच हल्लकल्लोळ माजला.सरकार हादरले.डॉ.बाबासाहेब आता गप्प बसणार नाहीत,याची नेहरूंना चांगलीच कल्पना आली.कारण त्याच सुमारास पंजाबराव देशमुख,आर.एल.चंदापुरी यांच्यासारखे अनेक ओबीसी नेते,डॉ.बाबासाहेबांच्या संपर्कात होते आणि या प्रश्नावर देशभर रान उठवण्यासंबंधी हालचाली करत होते.याचाही सुगावा नेहरूंना लागला होता.१९५२ साल उजाडले.पहिल्या सार्वत्रिक निवडणुका सुरु झाल्या.डॉ.बाबासाहेबांनी त्यांच्या पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात प्रथमच ३४० व्या कलमानुसार ओबीसींसाठी आयोग स्थापन करण्याचे अभिवचन दिले. देशभरातला ओबीसी समाज यामुळे काँग्रेसपासून दूर जाऊ शकतो आणि डॉ.बाबासाहेबांच्या पक्षाभोवती एकवटू शकतो हे चाणाक्ष नेहरूंच्या लवकर लक्षात आले. त्यांनी आयोगाचे आश्वासन द्यायला सुरुवात केली आणि अखेर २९ जानेवारी १९५३ ला दत्तात्रय बाळकृष्ण उर्फ काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला गेला.

कालेलकर हे ऊच्चवर्णीय समाजाचे होते आणि गांधीवादी होते. आयोगाचे काम करतांना त्यांना फीरावे लागत असे.३० मार्च १९५५ रोजी कालेलकरांनी आपला अहवाल राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद याना सादर केला.अहवालाचा सारांश पाहिल्यावर राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद भडकले. स्वातंत्र्य मिळवलेय,ते ह्या लोकांना मिठाई खिलवण्यासाठी काय ? असा कुत्सित शेरा राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी मारला आणि पंडित नेहरूंना तात्काळ फोन करून आपली नाराजी प्रकट केली.नेहरूंनी अहवाल ताबडतोब मागवून शिफारशी वाचल्या....त्यांनाही त्या आवडल्या नाहीत.लगेच नेहरूंनी कालेलकारांना बोलावून फैलावर घेतले.तुम्ही अहवाल लिहिला हे ठीक आहे.पण आता तो स्वीकारता येणार नाही,अशी तरतूद करा असे बजावले. दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३१ मार्चला कालेलकरांनी ३१ पानी पत्र लिहून, आपण आयोगाचे अध्यक्ष असलो तरी,या आयोगाने केलेल्या शिफारशींशी मी सहमत नाही, असे स्पष्ट शब्दात कळवले.त्यामुळे आयोगाची अंमलबजावणी तर सोडाच, आयोगाचा अहवाल संसदेत मांडला जाणार नाही याची तजवीज झाली.आयोगाचे अध्यक्षच या अहवालाशी सहमत नसल्यामुळे हा अहवाल संसदीय पटलावर ठेवण्याची व त्यावर चर्चा करण्याची आवश्यकता नाही असे संसदेत जाहीर करण्यात आले. पुढे बरीच वर्षे हा अहवाल विस्मरणात गेला होता. कालांतराने इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. १९७५ साली त्यांनी आणीबाणी लागू केली.त्याविरोधात सर्व विरोधी पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जनता पक्ष स्थापन केला.जनता पक्षाने १९७७ ची निवडणूक लढवली,या निवडणुकांना सामोरे जातांना जनता पक्षाने ’कालेलकर अहवालाची अंमलबजावणी करू’ असे जनतेला आश्वासन दिले. निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. जनता पक्षाचे राज्य आले,मोरारजी देसाई पंतप्रधान झाले.काही दिवसांनी ओबीसींचे शिष्टमंडळ त्यांना भेटायला गेले,तर ते म्हणाले, यह कालेलकर कमिशन पुराना हो गया है,अब हम ऐसा करेंगे,एक नया कमिशन बिठायेंगे... ! अशा तऱ्हेने निवडणुकात दिलेल्या आश्वासनाचा भंग करून ओबीसींना धोका देण्यात आला.हा इतिहास ओबीसी वाचून जागृत झाला पाहिजे होता तो आज पर्यंत नाही.त्याला कारण वैचारिक वारसा नाही. त्यांनी तो घेतला नाही किंवा त्यांना तो घेऊ दिला नाही.तुम्ही हिंदू आहात हेच डोक्यात बसून ठेवले.यावर ओबीसी समाजातील बुद्धीजीवी विचारवंत जाहीरपणे बोलत नाही.माझ्या सारखा कार्यकर्ता बोलायला लिहायला लागला.तर जास्त शहाणा म्हणून दुर्लक्षित केले जाते.म्हणूनच म्हणतो ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल!.

१ जानेवारी १९७९ रोजी बिंदेश्वर प्रसाद मंडल (इ.झ.च–छऊ–ङ) या ओबीसी खासदाराच्या नेतृत्वाखाली नव्या आयोगाची स्थापना झाली.३१ डिसेम्बर १९८० रोजी मंडल आयोगाचा अहवाल सरकारला सादर करण्यात आला. देशातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या ३,७४४ ओबीसी जाती शोधून काढण्यात आल्या. महाराष्ट्रात ३६० जाती ओबीसी असल्याचे निष्पन्न झाले.या जातींच्या उन्नतीसाठी मंडल आयोगाने अत्यंत महत्वपूर्ण अशा शिफारशी केल्या.ओबीसींच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या.परंतु १९८० ते १९९० या काळात केंद्र शासनाने या शिफारशी लागू करण्याबाबत जराही हालचाल केली नाही किंवा सहानुभूती दाखवली नाही.अक्षरश: दहा वर्षे मंडल आयोगाचा अहवाल धूळ खात पडून राहिला.याच दरम्यान देशभरातून मंडल आयोगाची अंमलबजावणी करा अशी मागणी होत होती.आंबेडकरी विचारांच्या वेगवेगळ्या संघटनेने दिल्लीत व देशात विविध ठिकाणी उपोषणे, आंदोलने केली फुले–शाहू–आंबेडकरी विचारांच्या प्रेरणेने काम करणाऱ्या संघटनांचा मंडल आयोग जागृतीत सिंहाचा वाटा होता. अक्षरश:शेकडो दलित लोक तुरुंगात गेले.विशेष गंमत म्हणजे काही अपवाद वगळता ओबीसी समाजाला मंडल आयोगाचा अहवाल ओबीसींसाठी आहे याचा थांगपत्ताच नव्हता.ज्याअर्थी आंबेडकरी विचारांचे नेते मंडल आयोगाच्या आंदोलनात हिरीरीने सहभागी झाले आहेत त्याअर्थी मंडल आयोग दलितांसाठीच आहे असा बहुसंख्य ओबीसींचा गैरसमज झाला होता. अखेर ७ आगस्ट १९९० रोजी तत्कालीन प्रधानमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी मंडल आयोग लागू करण्याची ऐतिहासिक घोषणा केली.घोषणा झाल्याबरोबर हिंदुत्वाचा पुकारा करणाऱ्या विश्व हिंदू परिषद,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बजरंगदल अनेक पक्ष संघटनांनी देशभर हैदोस घालून मंडल आयोगाला प्रचंड विरोध केला.त्यात ओबीसीच बहुसंख्येने मोर्चे,धरणे,रास्ता रोको,रेल रोको यात सहभागी होते.त्यात आंदोलनात बळी गेलेल्या ओबीसीची माहिती घ्यावी, म्हणजेच ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल.

मंडल आयोगाला प्रचंड विरोध केला.मोर्चे,धरणे,रास्ता रोको,रेल रोको गोष्टी तर त्यांनी केल्याच,परंतु मोठ्या प्रमाणावर हिंसक आंदोलने केली.काही विद्यार्थ्यांना तर अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिले.आणि सांगितले कि घेतले.देशात सगळीकडे वातावरण तंग बनले.एव्हढे करूनही व्ही.पी.सिंग यांनी निर्णय बदलला नाही.आपले सरकार भाजपने बाहेरून दिलेल्या टेकूवर उभे आहे हे ठाऊक असतांनाही व्ही.पी.सिंग ठाम राहिले.शेवटी अडवाणींची रथयात्रा लालूप्रसाद यादव यांनी अडविल्याच्या कारणावरून भाजपने पाठींबा काढून घेतला आणि सरकार पाडले.ओबीसींची बाजू घेणाऱ्या,ओबीसींना थोडाफार का होईना पण न्याय देवू करणाऱ्या व्ही पी सिंह सरकारला हिंदुत्ववाद्यांनी (मनुवाद्यांनी) असा जबर धक्का दिला. ओबीसी हे कुणी मुसलमान किंवा ख्रिश्चन नव्हते.ते तर ५२ टक्के हिंदूच होते. तरीही हिंदुत्ववादी,मनुवादी शक्तींना ओबीसींबद्धल बिलकुल प्रेम नव्हते. कारण,ओबीसी हे आपल्या धर्मव्यवस्थेतील शुद्र लोक आहेत,त्यांना उच्च शिक्षणाची, चांगल्या नोकर्या,चांगल्या राहणीमानाची आवश्यकता नाही ही हिंदूधर्माची धारणा त्यांच्या मनात पक्की रुजलेली होती.शूद्रांना (ओबीसींना) हलके लेखण्याची उच्चवर्णीयांची मानसिकता मंडल आयोगाच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली.आज जे ओबीसी स्वताला कट्टरपंथीय हिंदू किंवा उच्चवर्णीय सुवर्ण समजतात. त्यांना खरा इतिहास माहित नाही.किंवा ते इतिहास वाचत नाही.म्हणूनच ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल. मंडल आयोगाच्या माध्यमातून हळूहळू का होईना देशभरातला ओबीसी जागृत होत आहे याचे अचूक भान संघपरिवाराला आले.ही जागृती अशीच वाढत राहिली तर बहुसंख्य असलेला (५२% लोकसंख्या) हा समाज सत्ता,शिक्षण, संपत्ती,नोकरी,प्रतिष्ठा यातल आपला न्याय वाटा मागण्यासाठी संघर्ष करायला सिद्ध झाल्याशिवाय राहणार नाही आणि मग समाज व्यवस्थेमधले उच्चवर्णीयांचे उच्च स्थान अबाधित राखणे अवघड होईल.हे त्यांनी ओळखले. हे होऊ द्यायचे नसल्यास एकच उपाय – ऊर्ळींशींीळेप`ष –ींशपींळेप !. म्हणजे– दिशाभूल करणे, लक्ष दुसरीकडे वळवणे..!.

मंडल आयोगाच्या चळवळीला छेद द्यायचा असेल तर एखादा पर्यायी मुद्दा विशेषत: भावनिक,धार्मिक मुद्दा पुढे आणून त्यात ओबीसींना गुंतवले पाहिजे असा विचार संघपरिवारात होऊन राममंदिराचे आंदोलन सुरु झाले. आपण सारे हिंदू असून मुसलमान आपले दुश्मन आहेत. आपल्या देवाच्या रामाच्या जन्मभूमीच्या जागी आपल्या शत्रूची बाबरी मशीद आहे.ती जागा ताब्यात घेवून तिथे रामाचे मंदिर बांधणे आपले धर्मकर्तव्य आहे. असा प्रचार त्यांनी सुरु केला.अयोध्येत राम मंदिर झाले पाहिजे ही मागणी घेवून संघपरिवार पार खेड्यांपाड्यांपर्यंत गेला.धार्मिक अधिक भावनिक वातावरण तयार करण्यात आले. ’राममंदिरा’ साठी गावागावातून हळद–कुंकू लावून विटा गोळा करण्यात आल्या.देशाचे वातावरण मंदिरमय करण्यासाठी अडवाणींनी मुस्लिमांविरुद्ध धार्मिक भावना भडकवणारी रथयात्रा काढली. संपूर्ण भारतभर धर्मधुंद नशा पसरवण्यात आली.’’गर्व से कहो, हम हिंदू है’’ असा आक्रमक प्रचार करण्यात आला.या धर्मिक, भावनिक प्रचाराला इथला ओबीसी हां हां म्हणता बळी पडला. त्या नादात ओबीसी त्याचा मंडल आयोग पार विसरून गेला.मंडल मंडल म्हणण्याऐवजी ओबीसी कमंडल ंाी कमंडल ंाी म्हणू लागला.हिंदुत्ववाद्यांनी आपला डाव साधला. अरे,ओबीसी आपलाच हिंदू बांधव आहे,ओबीसी मागास राहिलेला आहे,ओबीसीला आरक्षण दिले पाहिजे, ओबीसीलाही शैक्षणिक,सामाजिक व राजकीयदृष्ट्या सशक्त केले पाहिजे असे या उच्चवर्णीयांना चुकुनही वाटत नाही.उलट,ओबीसींनी मंडल कमिशन विसरावे यासाठी त्यांना धर्माच्या नशेचे इंजेक्शन देण्यात आले आणि तुम्ही कडवट हिंदू आहात या भाषेत त्यांना हरभऱ्याच्या झाडावर चढवून मुस्लिमांविरुद्ध चिथावण्यात आले. म्हणजेच ज्यावेळी ओबीसींच्या विकासाचा प्रश्न येतो.त्यावेळी ओबीसी हे हिंदू असूनही शत्रू ठरतात, हे लक्षात घेऊन ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल.

आणि,इतर धर्मियांशी लढण्यासाठी मात्र त्यांना ‘कट्टर हिंदू’ म्हणून पुढे केले जाते...! ओबीसीही मग धर्माची राख डोक्यात घालून घेतात,आणि फुकट मरतात.धर्माची धुंदी इतकी असते की,आपले मित्र कोण..? शत्रू कोण..?.आपले हित कशात आहे..? हे ओबीसींच्या लक्षातच येत नाही.मंडल आयोगातील शिफारशी काय आहेत–ओबीसींना आरक्षण देण्यासंदर्भात मंडल आयोगाने अनेक महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत.या शिफारशी खालीलप्रमाणे –१). शासकीय–निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था,अनुदानित खाजगी संस्था शासनाचे सार्वजनिक उपक्रम व उद्योग या सर्व ठिकाणी ओबीसीसाठी २७ टक्के जागा राखीव जागा ठेवाव्यात.२). खुल्या स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या ओबीसी उमेदवारांचा समावेश खुल्या गटात करण्यात यावा.३). पदोन्नतीतही (झीर्रोींळेप) याच प्रकारचे आरक्षण द्यायला हवे.४). नोकरीसाठी वयोमर्यादेची अट शिथिल करावी.५). ज्या भागात इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या जास्त आहे,तिथे प्रौढशिक्षण वर्ग सुरु करावेत.(पालकांचे किमान शिक्षण असल्याशिवाय मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असे शैक्षणिक वातावरण निर्माण होत नाही..) ६). ओबीसी विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा व वसतीगृहे काढावीत.७). ओबीसी विद्यार्थ्यांसाठी इतरांच्या बरोबरीने येण्यास शाळा महाविद्यालयात विशेष मार्गदर्शन (कोचींग क्लास) सुरु करावे.८). ओबीसी विद्यार्थ्यांसाठी व्यवसायिक शिक्षण व तंत्र शिक्षणाची सोय.९). ओबीसींना उद्योग, व्यवसाय सुरु करण्यासाठी अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांची उभारणी करण्यात यावी.१०). कमाल जमीन धारणा कायद्याने अतिरिक्त जमीन ओबीसींना वाटून द्यावी.११). शिफारशींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सध्याच्या कायद्यात व नियमात आवश्यक ते बदल करावेत.या व अशा अनेक शिफारशी मंडल आयोगाने केल्या होत्या. त्यापैकी,फारच थोड्या शिफारशींची अंमलबजावणी होणार हे स्पष्ट होते.कारण,सर्वच शिफारशींची अंमलबजावणी करण्यात सत्ताधारी वर्गाला,मग तो कोणत्याही प्रस्थापित पक्षाचा असो,अजिबात उत्साह नव्हता.सर्व शिफारशी अंमलात आणल्या तर क्रांती होऊन आपल्याच हितसंबंधावर उद्या गदा येईल अशी भीती हे यामागील कारण असावे. (याबाबत सत्ताधारी कायम –श्रर्शीीं असतो.) मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचा निर्णय झाल्याबरोबर अहवालातील शिफारशींना आव्हान देत इंदर सहानी आणि अन्य तीस जण कोर्टात गेले.कोर्टात जाणारे हे सर्वजण उच्चवर्णीयच होते !.हे कृपया नेहमीसाठी लक्षात ठेवावे.इंदर सहानी विरुद्ध केंद्र सरकार हा खटला त्यावेळी मंडल आयोगाचा खटला म्हणून विशेष गाजला.या केसचा निकाल १६ नोव्हेंबर १९९२ रोजी लागला.या निकालाने मंडल आयोगाचा अक्षरश: ‘निकालच’ लावला.अहवालाच्या अंमलबजावणीवर इतके निर्बंध लावले की मंडल आयोग ‘असून नसल्यासारखाच’ अशी त्याची गत झाली.या निकालाने,१). ओबीसी म्हणून आरक्षण घेवू पाहणाऱ्यांना ’क्रिमीलेअर’चा निकष लावला.२). एकूण आरक्षणाने ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता कामा नये ही अट घातली.३). ओबीसींना पदोन्नती आरक्षण नाकारले.४). देशात ३,७४४ ओबीसी जाती असल्या तरी प्रत्यक्षात त्यातल्या १,९८० जातींनाच आरक्षण मिळेल अशी अप्रत्यक्ष व्यवस्था केली गेली.कोर्टाच्या निकालपत्रातील वरील चारही आदेशांचा ओबीसींच्या आरक्षणावर दूरगामी आणि विपरीत परिणाम झाला. कोर्टाच्या निकालाद्वारे मंडल आयोग लुळापांगळा करण्यात आला.न्यायपालिके मध्येही सर्व उच्चवर्णिय असल्यामुळे त्यांना मंडल आयोग निष्क्रिय करणे सोपे गेले...! मंडल आयोगाच्या माध्यमातून जागृत होत असलेला ओबीसी वर्ग त्यामुळे संभ्रमित झाला.चिडला.असे होणार हे गृहीत धरून चिडलेल्या ओबीसींचा राग दुसरीकडे वळवण्यासाठी,रागाचा निचरा करण्यासाठी त्याच्यासमोर खोटा शत्रू मुसलमान ऑलरेडी उभा करण्यात आला होताच. आणि राममंदिराचा प्रश्नही तयार करून ठेवला होता,तोही जास्तच पेटवण्यात आला.या वातावरणाचे पर्यवसान ६ डिसेम्बर १९९२ या दिवशी अयोध्येत बाबरी मशीद पाडण्यात झाले.

न्यायालयाने दिलेल्या मंडलासंबधीच्या निकालानंतर अवघ्या वीस (२०) दिवसांनी ही घटना घडली,घडवून आणण्यात आली मशीद पडल्यानंतर देशभर दंगली उसळल्या.त्यानंतर आजपर्यंत भारतात दंगली,बॉम्बस्फोट,अशा प्रकारच्या ज्या ज्या घटना घडल्या,त्यातल्या जवळजवळ सर्व घटना बाबरी मशिदीच्या पतनाच्याच प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष प्रतिक्रिया आहेत, असे समाजशास्त्रज्ञांचे व या विषयातील तज्ञांचे मत आहे.ज्यांनी व्हू वेअर दि शुद्राज हा ऐतिहासिक ग्रंथ लिहून ओबीसींचे आत्मभान जागविले,ओबीसींमध्ये चेतना निर्माण केली,सर्वांचा विरोध होतअसतांना संविधानात ३४० वे कलम घातले,त्याद्वारे मंडल आयोगाला जन्म दिला आणि ओबीसींना त्यांचे न्याय, हक्क व अधिकार मिळण्याचा मार्ग खुला केला,त्या परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिनिर्वाण दिनी बाबरी मशिद पाडण्यात आली...! अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या,ओबीसींच्या कल्याण व हितासाठी झटणाऱ्या खऱ्या देशभक्ताच्या निर्वाणदिनी बाबरी मशिदिच्या विध्वंशाच्या निमित्ताने ओबीसींना खुशी साजरी करायला लावले....!.मनुवाद्यांचे केवढे मोठे हे षडयंत्र....! व आमच्या ओबीसी बांधवांचे केवढे मोठे दुर्दैव....!.भारतातील बहुसंख्य असलेल्या (संपूर्ण लोकसंख्येच्या ५२% टक्के) जइउ समाज जो कोणत्याही क्षेत्रात घशूर्झीीं वर म्हणजे अधिकाराच्या/मोक्याच्या जागांवर हमखास राहू शकतो.राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री व अश्या सर्वच क्षेत्रातल्या मुख्य जागांवर येवून संपूर्ण देशाचा जो राजा होवू शकतो,त्याला आता गर्वसे कहो..... मध्ये अडकवून पार भिकारी व हतबल करून सोडला आहे या मनुवाद्यांनी. करा विचार करा आणि वैचारिक वारसा स्वीकारून अंमलबजावणी करण्यासाठी आचरण करा.त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चोवीतास भारतीय संविधान हातात घेऊन रक्षणासाठी उभे आहेत.फक्त त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदली करा.ओबीसी बांधवानो इतिहास वाचा म्हणजे वाचाल.

जय ओबीसी जय संत भोजलींग,जय ओबीसी.जय विश्वकर्मा. जय संविधान.जयभीम.

प्रमोद सूर्यवंशी ८६०५५६९५२१,चिखली,मातृतीर्थ बुलडाणा

# आरक्षणाचे राजकीय जनआंदोलने आणि अडथळे?.

मराठा आरक्षण आंदोलन आता पुन्हा पुन्हा का पेट घेत आहे.राज्यातील सहा मागासवर्गीय आयोगाने व दोन केंद्रातील आयोगाने आणि मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द करून टाकले.तरी मनोज जरांगे पाटील महाराष्ट्र राज्य ढवळून काढत आहेत.त्यामुळे सर्वच युती आघाडी महाआघाडी सरकार मधील पक्ष कार्यकर्ते नेते अडचणीत आले.त्यातून बाहेर पडण्यासाठी अजित दादांनी मागासवर्गीय समाजातील कामगार,कर्मचारी अधिकारी यांच्या आरक्षणातून पदोन्नतीला ७/५/२०२१ च्या आदेशाने सुरुंग लावून दोन समाजातील असंतोष शांत करण्या ऐवजी उघडपणे आग लावली होती.आरक्षणातुन पदोन्नतीसाठी मराठा आणि मागासवर्गीय आपसात भिडतील अशी अपेक्षा केली जात होती.मराठा समाज जसा गरीब,श्रीमंत यात विभागला आहे तसाच मागासवर्गीय ओबीसी,आदिवासी अल्पसंख्याक समाज गर्वसे कहो हम हिंदू है म्हणणाऱ्या संस्था,संघटनेत विभागला आहे.तो आरक्षणाचा समर्थक आहे कि विरोधक हे त्यालाच आता ठरवणे अवघड झाले आहे.तो काही निर्णयक भूमिका घेण्याच्या आदी आंबेडकरी विचारांच्या मागासवर्गीय कर्मचारी अधिकाऱ्यांनी जनांदोलन करण्याची भूमिका घेऊन एकत्र येवून आरक्षण हक्क कृती समिती स्थापना करून संघर्षास तयार झाली होती.आरक्षण लाभार्थींनी कोणत्या राजकीय पक्षा कडून अपेक्षा करू नये.सर्वच संधीसाधू असतात व आहेत.हे लक्षात घ्यावे.

महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुका २०१४ ला झाल्या तेव्हा राजकीय जनआंदोलन करणारे विरोधक सत्ताधारी झाले.त्यामुळे पूर्वीचे सत्ताधारी पूर्णपणे अपंगत्व आल्यासारखे झाले. विरोधी पक्षनेते म्हणून काम करण्याची हिंमत त्यांच्यात राहीली नाही.तीच परिस्थिती २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत होईल अशी अपेक्षा ठेऊन काँग्रेस राष्ट्रवादीचे वतनदार,वजनदार मराठा घराणे भाजप शिवसेनेत गेले युतीने जिद्दीने विधानसभा निवडणूक लढवली आणि जिंकली.माननीय नामदार देवेन्द्र फडणवीस यांनी मी पुन्हा येईल ही प्रतिज्ञा घेतली होती. ती पूर्ण होणार हे शंभर टक्के खात्री झाली होती. पण त्याला शिवसेना पक्षप्रमुख यांनी आदरणीय शरद पवार यांच्या आशीर्वादाने सुरुंग लावला होता. त्यात आता संपूर्ण महाराष्ट्र भरडल्या जात आहे. आरक्षणाचे राजकीय आंदोलने आणि अडथळे ?. हे जनतेला मतदारांना मूर्ख बनविण्यासाठी असतात. काही करून सत्ता काबीज केलीच पाहिजे हे सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख उदिष्ट असते हे दाखवुन दिले.

देशात दरवर्षी प्रचंड जनआंदोलन होतात.त्यात अपयश आले की नेते आत्महत्या करीत नाही.पण काही भावनिक भक्त आत्महत्या करतात.असंघटित कामगार हा संपूर्ण मागासवर्गीय समाजातील आहे.ज्यांना गावी शेतजमीन नाही,तो मोलमजुरी करून जगतो. पण जातीच्या आंदोलनात सर्वात पुढे असतो.अमके धमके आगे बढो!. हम तुम्हारे साथ है!. बेबीच्या देठा पासुन घोषणा देतात. त्यांच्या रोजीरोटी साठी काही नाही केले तरी चालेल त्यांच्या सुखा दुःखात सहभागी झाले नाही तरी चालेल.तरी जातीच्या प्रश्नांसाठी महापुरुषांची फसवणूक करण्यासाठी तुम आगे बडो!.असे म्हणणारा मागासवर्गीय समाज नेहमीच आघाडीवर असतो.पदोन्नती आरक्षण हे कायमस्वरूपी नोकरी करणाऱ्यासाठी होते . तरी काही असंघटित कामगार व त्यांचे जिगरबाज नेते कायदा सुव्यवस्था मोडून नेते बनण्याचा शॉटकट मारतात.थोडे दिवसनी म्हणतात आमच्यावरील गुन्हे माफ करा. आपली जात न विसरता शेतकऱ्यांनी अनेक मोर्चे आंदोलन केली प्रत्येक वेळी झेंडा व पक्ष वेगळा होता.आजचा सत्ताधारी तेव्हा विरोधी पक्षात होता तेव्हाचा शेतकरी मोर्चा माओवादी नव्हता,हिंदुत्ववादी,मनुवादी होता.आजचा शेतकरी लाल बावटा घेतलेला काळा मळकट चेहरा व कपडे घातलेला होता. म्हणूनच तो शेतकरी कमी (कम्युनिस्ट माओवादी) रानावनात राबणारा शेतमजूर जास्त होता. तेव्हाचे शेतकरी मोर्चे कधी पायी नसत त्यांचासाठी गाड्याची विशेष व्यवस्था असायची त्यांचे चेहरे व कपडे काळे मळकट दिसणार नाही यांची दक्षता घेतली जात होती.कारण तो शेतकऱ्यामधील साधन शेतकऱ्यांपेक्षा राजकारणातील असंतुष्ट राजकीय नेता जास्त होता. त्यात त्यांच्याकडे काम करणारा कामगार व मजूर मालकाच्या आदेशानुसार सहभागी होत होता. म्हणूनच तो शेतकरी होता.म्हणूनच आंदोलन झाली पण आत्महत्या नाही,आणि अडथळे तर नाहीच नाही. त्यांच्यासाठी पोलीस,प्रशासकीय यंत्रणा प्रिंट चॅनल मीडिया हात जोडून उभी असायची.

वंचित शोषित पिढीत मागासवर्गीयांचा समाजाचा मोर्चा म्हणजेच नक्षलवादी.कारण अन्याय अत्याचार सहन न करता त्याविरोधात आवाज उचलून संघर्ष करणारा नक्षलवादी ठरविण्याचा उच्चवर्णीय मान्यताप्राप्त सरकारी प्रशासकीय आदेश असतो.त्याला प्रशासकीय जाहिराती मिळणारे वृत्तपत्र आणि चॅनल मीडिया भरपूर प्रसिद्धी देतात.ते प्रसिध्द माध्यमाचे कात्रण कोर्टात पुरावा म्हणून ग्रहाय धरल्या जाते.मग अधिकृतपणे वंचित शोषित पिढीत मागासवर्गीयांचा समाजाचा मोर्चा आंदोलन म्हणजेच नक्षलवादी कारवाया ठरविल्या जातात.राजकीय जनआंदोलन,शेतकऱ्यांची आत्महत्या आणि प्रशासकीय अडथळे येणारच ही परंपरा आज ही कायम ठेवली जात आहे.

एक मराठा लाख मराठा ही कुणाची कल्पना होती माहिती नाही.पण ही टॉग लाईन मोठी झाली त्यामुळे गरीब श्रीमंत मराठा आपले पक्ष संघटना विसरून एक दिवसासाठी एकाच प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एकत्र आले. लक्षवेधी ५७ अभूतपूर्व मोर्चे शांततेत काढले. त्यातुन एकही राज्यपातळीवर सामाजिक,राजकीय नेतृत्व करणारी व्यक्ती पुढारी म्हणून पुढे आली नाही.राजकीय अस्थिरता निर्माण झाली नाही.सर्वच राजकीय पक्षांनी रस्त्यावर आंदोलनात सहभाग व जाहीर पाठिंबा दिला.पण विधानसभेत,विधानपरिषदेत पक्षहित विचारधारा आणि राजकीय लाभ डोळ्यासमोर ठेवला.त्यामुळे मराठा क्रांती मोर्चा आंदोलन हिंसक नाही बनले.मग आताच का मराठा मोर्चा हिंसक बनला?. कारण मराठा आंदोलनामुळे समाजात प्रचंड असंतोष निर्माण व्हावा त्यातुन जातीय दंगल घडावी अशी पेशवा सरकारची इच्छा होती. ते शक्य झाले नाही म्हणून आपलेच माणस मोर्चात पाठवुन तोडफोड करावी त्यामुळे आपोआप जमाव हिंसक बनेल आणि तोडफोड होईल त्याचे जातीय दंगलीत रूपांतर होईल अशी योजना पेशवा सरकारची होती.त्यामुळे आंदोलन,आत्महत्या आणि अडथळे कसे निर्माण होतील यांचे ही नियोजन होते.पण तसे गंभीर प्रकरण घडलेच नाहीत.काही तुरळक लक्षवेधी घटना घडल्या त्यातील आरोपी पकडल्या गेले असतील परंतु त्यांचा तपशील आज पर्यंत जाहीर झाला नाही.पण मराठा क्रांती मोर्चात समाजकंटक घुसले त्यांनी हे कृत्य केले असे मोर्चाचे समनव्यक व सरकारच सांगते.मग मराठा मोर्चात समाजकंटक कुठून आले हा प्रश्न आता अधांतरी राहिला.

मराठा,ओबीसी,धनगर समाजाच्या मोर्चात मोठा धमाका करण्याचे नियोजन होते. हे नालासोपारा,सातारा, कोल्हापूर पुणे येथील सनातनी देशभक्त आणि शिवभक्त शिवप्रतिष्ठानचे आज्ञाधारक साधक,धारकरी यांच्या घरी प्रचंड साठ्या सह पकडले पोलिसांनी आपली कर्तव्यदक्षता दाखविली. पण पेशवा सरकारच्या गृहमंत्री असलेल्या संस्कारीत पारदर्शक कारभार करणाऱ्याने ए टी एस प्रमुखाची तडकाफडकी बदली करून टाकली.आणि आपला वैचारिक वारसा दाखवून दिला. त्याबाबत समाजात प्रचंड प्रमाणात प्रतिक्रिया उमटली पाहिजे होती.प्रिंट,चॅनल मीडियाने यावर रान पेटविले पाहिजे होते. पण असे काहीच झाले नाही,उलट वैभव राऊत च्या समर्थानात हजारो लोक रस्त्यावर उतरले होते. ते कोण होते देशप्रेमी?, धर्मरक्षक?. की गोरक्षक?. त्याच्या आंदोलनाला समाजाचा सरकारचा मूक पाठिंबा होता.त्यातील कोणीच आत्महत्या केली नाही आणि त्यात अडथळे निर्माण करणाऱ्या ए टी एस पोलीस अधिकाऱ्यांना अलगत बाजूला केले.यांचा देशातील तमाम मागासवर्गीय समाजाने गांभीर्याने विचार केला पाहिजे होता, आरक्षण मांगण्यासाठी आंदोलन बंद करा. निराश होऊन आत्महत्या करू नका,अडथळे निर्माण करणाऱ्या यंत्रणेला सुधारण्यासाठी आपल्यात वैचारिक सुधारणा करा म्हणजे आरक्षणाचे राजकिय जनआंदोलन आणि अडथळे ?. का कशासाठी स्वाभिमानी जगण्यासाठीच नां?. मग आपण कोणत्या विचारधारेचे समर्थक आणि विरोधक आहोत हे एकदा शांतपणे विचार करून ठरवा. आरक्षण मिळाल्यास किती लोकांना लाभ मिळेल?. आत्महत्या केल्यास कोणाचे नुकसान होईल?, आणि अडथळे निर्माण करणारे कोण आहेत?.खेड्या पाड्यातील मतदारांनी जातीपातीच्या पक्षाच्या भिंती पाडून उमेदवार निवडून दिला.

आरक्षणासाठी,शेतकऱ्यांच्या साठी, महागाईसाठी,शिक्षणाच्या बाजारीकरणासाठी, बेरोजगारीसाठी, विविध पक्षांनी केलेली राजकीय जनआंदोलने खरेच ह्या समस्या सोडवण्यासाठी होत्या काय?. हा प्रश्न आज कोणालाच का पडत नाही. आता यापुढे कोण कोणा विरोधात राजकीय जनआंदोलन करेल आणि त्यात अडथळे कोण निर्माण करेल व सोडविल. कोणत्या जातीच्या लोकांनी कोणत्या पक्षावर विश्वास ठेवावा.शेतकऱ्यांनी,बेरोजगारांनी,कामगारांनी मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांनांनी कोणत्या नेत्यावर विश्वास ठेऊन जन आंदोलनात सहभाग घ्यावा.कारण ही सर्व राजकीय जन आंदोलने आणि अडथळे भारतीय संविधानाच्या चौकटी मोडून काढण्यासाठी आणि स्वार्थासाठी होते. सरकार कोणाचे ही असो ते जनतेचे आपल्या परीने शोषण करणारेच असेल हे मात्र निश्चित झाले आहे.



आरक्षणातील पदोन्नती आणि मराठा आरक्षण यातील फरक कोणाच्या लक्षात का येत नाही.मराठा समाजाला आरक्षण शिक्षण, नोकरी साठी ओबीसीच्या कोट्यातून नव्याने पाहिजे. तर पदोन्नती आरक्षण हे सध्या नोकरी करीत असलेल्या मागासवर्गीय कर्मचारी,अधिकारी यांना मिळणार होते.एक मराठा लाख मराठा आंदोलन पदोन्नती साठी नव्हते.मग हे सर्व आरक्षणाचे राजकीय जनांदोलन आणि अडथळे यांचा सर्व समाजानी गांभियाने विचार केला पाहिजे.सर्व समाजात बंधूभाव मैत्री भावना वाढली पाहिजे.वैर भावना वाढवून कोणाचाच फायदा होणार नाही.

सागर रामभाऊ तायडे,भांडुप मुंबई ९९२०४०३८५९,
अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य

# राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यात भाजपाला दणदणीत यश;

लातूर :- नुकत्याच झालेल्या पाच राज्यातील निवडणुकीच्या मतमोजणीत राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यात भारतीय जनता पार्टीने दणदणीत विजय संपादन करून एक हाती सत्ता मिळविल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील संवाद संपर्क कार्यालयासमोर भाजपा कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष केला.



पाच राज्यात विधानसभेची निवडणुक झाली चार राज्यातील निवडणुकीची रविवारी मतमोजणी होऊन त्यात भारतीय जनता पार्टीने एक हातात सत्ता मिळवली या विजयाचा जल्लोष भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयासमोर भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत फटाके फोडून एकमेकांना मिठाई देऊन आनंद व्यक्त केला.

देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी गेल्या नऊ वर्षात देशभर गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतले, देशाचा चौफेर विकास करण्याचा प्रयत्न केला, वर्षानुवर्ष अडगळीत पडलेल्या राम मंदिर, कश्मीरचे ३७० कलम यासह अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. देशाला प्रगतीपथावर घेऊन जाणाऱ्या मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा या निवडणुकीच्या माध्यमातून जनतेने विश्वास व्यक्त केला असल्याची प्रतिक्रिया भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

भाजपाच्या संवाद कार्यालयासमोर जल्लोष व्यक्त करताना भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, लातूर ग्रामीण अध्यक्ष अनिल भिसे, रेणापुर तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, महिला आघाडीच्या शिला आचार्य, संगायो समितीचे सदस्य शरद दरेकर, चंद्रकांत कातळे, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, मुरडवचे सरपंच लक्ष्मण यादव, उपसरपंच आकाश चव्हाण, सिंधगावचे सरपंच सुनील चेवले, पानगावचे बाबुराव कस्तुरे, कार्तिक गंभीरे, यशवंतवाडीचे सरपंच ओम चव्हाण, हरवाडीचे उपसरपंच चंद्रकांत माने, भंडारवाडीचे व्हाईस चेअरमन भरत बरुळे, पाथरवाडीचे सरपंच महेश सुडे, उपसरपंच व्यंकट येमले, भालचंद्र सूर्यवंशी लक्ष्मण खलंग्रे, भैय्या गाडे, संतोष बरुळे, कल्याण हारवाडीकर, भरत बरुळे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिनानिमित्त उमंग ऑटिझम सेंटर तर्फे विविध कार्यक्रम संपन्न

लातूर :- ३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिनानिमित्त उमंग ऑटिझम सेंटर तर्फे विविध कार्यक्रम संपन्न. दिव्यांग दिन संपूर्ण विश्वात साजरा केला जातो त्याचेच अवचित्य साधून उमंग ऑटिझम सेंटर तर्फे विविध कार्यक्रमांची आयोजन केले जाते. अमली पदार्थ विरोधी मोहिमे अंतर्गत लातूर पोलीस दलाकडून एक धाव व्यसनमुक्तीसाठी या शीर्षकाखाली मॅरेथॉन स्पर्धेसोबत उमंग ऑटिझम सेंटर तर्फे एक धाव दिव्यांगासाठी चे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये दिव्यांग व्यक्तींनी आपला सहभाग नोंदविला होता व दिव्यांगांना या मॅरेथॉन स्पर्धे अंती व्हीलचेअरचे वाटप देखील करण्यात आले. तसेच उमंग ऑटिझम सेंटर तर्फे समाजामध्ये जागरूकता निर्माण व्हावी म्हणून सर्वांना याविषयी माहिती देण्यात आली. यासोबतच जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगाची प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभात फेरीला मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर श्री अनमोल सागर व प्रादेशिक उपयुक्त समाज कल्याण विभाग श्री अविनाश देवशेटवार यांनी प्रभात फेरीला हिरवा झेंडा दाखवून प्रभात फेरीचे सुरुवात केली. दिव्यांगाची प्रभात फेरीची सुरुवात क्रीडा संकुल लातूर येथून सुरू होऊन ते जिल्हा परिषद लातूर येथे या प्रभात फेरीचे सांगता झाली. या प्रभात फेरीमध्ये लातूर जिल्ह्यातील विविध




दिव्यांग क्षेत्रातील शाळा व संस्थांनी आपला सहभाग नोंदवला होता. या प्रभात फेरी मार्फत दिव्यांगाने बनवलेल्या फलकांमार्फत समाजामध्ये जागरूकतेचा संदेश देण्यात आला. या प्रभात रॅलीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर अनमोल सागर, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग अविनाश देवशेटवार, चिकुर्ते, डॉ. प्रशांत उटगे अध्यक्ष उमंग सेंटर लातूर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष कुमार नाईकवाडी, बसवराज पैके समन्वयक जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, किरण उटगे सचिव उमंग सेंटर लातूर, राम वंगाटे अधीक्षक समाज कल्याण जिल्हा परिषद लातूर, राजू गायकवाड वै.सा.का. समाज कल्याण लातूर,श्रीहारी गोरे व्यवस्थापक उमंग सेंटर लातूर, लातूर जिल्ह्यातील दिव्यांग शाळांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या प्रभात फेरीमध्ये सहभागी होते.

# पानगावच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारकात विविध कार्यक्रमांचे आयोजन व्ही.आचार्य यांची माहिती

लातूर:- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने पानगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारकात दि.५ व ६ डिसेंबर २०२३ रोजी तथागत गौतम बुध्दांच्या अस्थिची प्रतिष्ठापणासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे असे सांगून या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन चैत्य स्मारकाचे अध्यक्ष व्ही.के.आचार्य यांनी येथे पत्रकार परिषदेत केले.

अधिक माहिती देताना ते म्हणाले की,मंगळवार,दि.५ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता सदर तीन एकर स्मारकामध्ये तथागत गौतम बुध्दांच्या अस्थिंची प्रतिष्ठापणा कुशीनगर बौध्द भिख्खु संघांचे अध्यक्ष तथा बाबासाहेबांना धम्म दीक्षा दिलेले भदंत चंद्रमणी यांचे शिष्य भदंत अग्गमहापंडीत ज्ञानेश्वर महास्थवीर यांच्या हस्ते होणार आहे,या कार्यक्रमाला क्रिडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभणार आहेत.सकाळी ९ वाजता कुशीनगर येथील भंते सागरा महाथेरो, काळेगावचे भंते महाविरो महाथेरो, खरोसा लेणीचे भंते सुमेध नागसेन, सिरसाळाचे भंते नागसेन, उदगीरचे भंते नागसेनबोधी व नवदीक्षित श्रामणेर संघाच्या उपस्थितीत तथागतांच्या अस्थिंची पानगावात शोभायात्रा



काढण्यात येणार आहे.त्यानंतर धम्मदेसना होईल.


दि.६ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दुपारी १२.३० वाजता अस्थिअभिवादनाचा कार्यक्रम होणार आहे. लातूर ग्रामीणचे आ.धीरज देशमुख यांच्या अध्यतेखाली होणार्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री आ.अमित देशमुख,जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, पोलीस अधीक्षक वैजनाथ शिंदे, माजी आ.त्र्यंबक भीसे, यशवंत पाटील, प्रमोद जाधव, सर्जेराव मोरे, अनंतराव देशमुख, उमाकांत खलंग्रे, चंद्रचुड चव्हाण, विजय देशमुख,डॉ. सुलक्षणा शिलवंत धर,लक्ष्मण कांबळे,उषाताई कांबळे, मोहन माने, चंद्रकांत चिकटे, प्रा.अनंत लांडगे, अशोक कांबळे, सुरेश लहाने, ईश्वर गुडे,ललिता कांबळे, संतोष नागरगोजे, सतीष भंडारे, डॉ.संजय हरिदास ,गयाबाई कस्पटे, शिवाजी आचार्य हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दादरची चैत्यभूमी,नागपूरची दीक्षाभूमीनंतर महाराष्ट्रात तिसर्या स्थानावर पोहोचत असलेल्या पानगावच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चैत्यस्मारकातील या कार्यक्रमांना बुध्द-आंबेडकर प्रेमीनी उपस्थित रहावे असे आवाहनही व्ही.के.आचार्य यांनी केले.

या पत्रकार परिषदेला पानगावचे भंते धम्मबोधी, प्रा.अनंत लांडगे,चंद्रकांत चिकटे, लक्ष्मण कांबळे,डी.टी.सूर्यवंशी,विजय श्रंगारे,एस.टी. चांदेगावकर,रमेश श्रंगारे, ॲड.राजकुमार गंडले,गुलाब चव्हाण स्मारकाचे सचिव वैभव आचार्य आदी उपस्थित होते.

# डाळिंब आणि बीट खाल्ल्याने खरंच शरीरात लोहाचे प्रमाण वाढते का? डॉक्टर काय सांगतात? वाचा

डाळिंब आणि बीट खाल्ल्याने खरंच शरीरात रक्ताचे प्रमाण वाढते का याविषयी डॉक्टर काय सांगतात वाचा उत्तम जीवनशैली जगण्यासाठी शरीराचे आरोग्य निरोगी असणे खूप महत्वाचे असते. यासाठी शरीरातील पोषक तत्वांची कमतरता दूर करणे गरजेचे आहे. विशेषत: शरीरात लोह पोषक तत्व खूप महत्त्वाचे मानले जाते. कारण लोहाच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होऊ शकतात. महिलांमध्ये निमियाची समस्या जाणवू शकते. लोहाच्या कमतरतेमुळे केस गळण्याची समस्याही वाढते. शरीरात लोहाचे प्रमाण योग्य असेल तर हिमोग्लोबिन वाढते. अशावेळी आहारात दररोज १० ग्रॅम लोहयुक्त पदार्थांचा समावेश करण्याची शिफारस केली जाते. यावेळी अनेकजण शरीरात लोहाचे प्रमाण वाढवण्यासाठी आहारात बीट आणि डाळिंबाचा समावेश करण्याचा सल्ला देतात. ते लाल रंगाचे असल्याने शरीरात रक्त वाढून लोहाच्या कमतरतेमुळे अशक्तपणाचा सामना करण्यासाठी फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. डाळिंब आणि



बीट खाल्ल्याने खरंच शरीरात रक्ताचे प्रमाण वाढते का, याविषयी हैदराबादमधील यशोदा हॉस्पिटलचे वरिष्ठ सल्लागार, फिजिशियन डॉ. दिलीप गुडे यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.

# महापरिनिर्वाण दिनी लातुरात सामूहिक महा बुध्द वंदनेचे आयोजन.

लातूर :- भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे समस्त लातूरकरांच्या वतीने व पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शन खाली सामुहीक महा बुध्द वंदना अभिवादन कार्यक्रम दि.०६ डिसेंबर २०२३ रोजी बुधवार सकाळी ठीक ०७ :३० वाजता,डॉ.बाबासाहेब पार्क लातूर या ठिकाणी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन महाबुध्द वंदना कार्यक्रमास उपस्थित रहावे.असे आवाहन सामूहिक महा बुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आले आहे.याप्रसंगी प्रत्येकाने सोबत येताना गरजूवंत विध्यार्थ्यां करीता जास्तीत जास्त प्रमाणात पेन - वही सोबत घेऊन यावे.सर्व समाज बांधवांनी आपआपल्या परिसरात,नगरात,चौकात,बुध्द विहारात,सभागृहात महाबुध्द वंदने नंतर अभिवादन कार्यक्रम सकाळी १०.०० नंतर आयोजीत करावेत. महाबुध्द वंदना कार्यक्रम संपल्यानंतर पानगाव चैत्य स्मारकास जाणाऱ्यांनी दुपार नंतर जावे.महाबुध्द वंदना यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने आपले कुंटुंब आपली जबाबदारी याप्रमाणे कुंटुंबासहीत उपस्थित रहावे.घरी कुणीही थांबू नये.कर्मचारी वर्गाने वर्किंग डे



बुधवार जरी असला तरी देखील सकाळी लवकर कार्यक्रम रींशपव करून आपल्या कर्तव्यावर जावे. सर्वांनी या सामाजिक कार्यक्रमाचे स्वतःहून प्रचारक व्हावे.विशेषतः तरुण युवा वर्गाने पुढे येऊन षरलशलेझ, ठशशश्र, ुहरीी रीिीरीीी, ींशीं ीस,स्वतः चे तयार करावेत.शहरात केवळ बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे इच्छुकांनी आपले फोटो न टाकता केवळ नाव टाकुन बँनर्स लावावेत, दुचाकी व चार चाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था ही सात मजली इमारतीच्या बाजूच्या ग्राउंड वर करावी.सर्वांनी पांढरा पोशाख परिधान करून, घरी कुणीही न थांबता घरातील सर्वच मंडळींनी वेळ काढून महा बुध्द वंदनेस उपस्थित राहुन महामानवास एकतेने,निष्ठेने,विनम्रपणे अभिवादन करावे असे विनंती पूर्वक आवाहन महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## ‘अधिवक्ता दुरुस्ती विधेयक’ लोकसभेत मंजूर

नवी दिल्ली : लोकसभेत सोमवारी ‘अधिवक्ता (दुरुस्ती) विधेयक, २०२३’ मंजूर करण्यात आले. न्यायालयाच्या आवारातील दलालांची भूमिका संपवणे हा या विधेयकाचा उद्देश असल्याचे सरकारकडून सभागृहात सांगण्यात आले. लोकसभेने आवाजी मतदानाने हे विधेयक मंजूर केले. गेल्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक राज्यसभेत मंजूर करण्यात आले होते. लोकसभेत या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने निर्णय घेतला आहे की, जे वसाहतवादी कायदे निरुपयोगी झाले आहेत ते रद्द केले जातील. ही दुरुस्ती आणण्याचा उद्देश पूर्णपणे पवित्र आहे.विधेयकावरील चर्चेत इतर अनेक सदस्यांनीही भाग घेतला. विधेयकावरील चर्चा आणि मंत्र्यांच्या उत्तरानंतर सभागृहाने आवाजी मतदानाने विधेयक मंजूर केले. हे विधेयक मागे घ्यावे, स्थायी समितीकडे फेरविचारासाठी पाठवावे आणि विस्तारित विधेयक मांडावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्या सुप्रिया सुळे यांनी केली. सरकारने, बार कौन्सिल ऑफ इंडियाशी (बीसीआय) सल्लामसलत करून, कायदेशीर व्यवसायी कायदा, १८७९ रद्द करण्याचा आणि वकील कायदा, १९६१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.



# तुम्ही ग्रंथालये लोकाभिमुख बनवा,आम्ही प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आ.विक्रम काळे यांचे आश्वासन

घाटनांदूर :- ग्रंथालयांच्या वार्षिक अधिवेशनात विविध विषयावंर चर्चा होवून त्यातून मिळालेल्या माहितीचा आपल्या दैनंदिन कामात सुधार होण्यासाठी,सेवा गतिमान करण्यासाठी उपयोग केला पाहिजे पण मोजकेच कर्मचारी अशा अधिवेशनाला उपस्थित राहतात,मग त्यांचे प्रश्न कसे मार्गी लागणार? असा सवाल करुन सार्वजनिक ग्रंथालयांनी दररोज ग्रंथांची देवघेव करण्यापेक्षा बरोबरच स्पर्धा परीक्षा वर्ग,अभ्यासासिक चालवावी,शेतकरी,महिलांसाठी मार्गदर्शन शिबीरे आयोजित करुन शासनाच्या योजनांची माहिती द्यावी,त्यातून ग्रंथालये लोकाभिमुख होतील,तुम्ही ग्रंथालये लोकाभिमुख बनवा,आम्ही सरकार म्हणून तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी नक्कीच प्रयत्नशील राहू,आता हिवाळी अधिवेशनात तुम्ही नागपूरला आंदोलन करा आम्ही विधीमंडळात आवाज उठवू असे आश्वासन औरंगाबाद शिक्षक मतदार संघाचे आ.विक्रम काळे यांनी दिले.

मराठवाडा ग्रंथालय संघाचे ४७ वे आणि बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे ४८ वे वार्षिक अधिवेशन,गुरुदास सार्वजनिक ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने घाटनांदूर येथील कृष्णाई मंगल कार्यालयातील ग्रंथमित्र कै.अनंतराव चाटेसाहित्य नगरीत, सोमवार,दि.४ डिसेंबर२०२३ रोजी पार पडले,त्याचे उद्घाटन आ.काळे यांच्या हस्ते पार पडले,त्यावेळी ते बोलत होते.या सत्राच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार हे होते.मंचावर सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले,कोषाध्यक्ष डॉ.राजेंद्र सानप,कार्याध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्यवाह संतोष ससे,माजी आ.गंगाधर पटणे, माजी आ.संजय दौंड,नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी,राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ.रामेश्वर पवार,प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे,अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथतुला केली ते ग्रंथमित्र नरहरी मंठेकर,भागीरथी मंठेकर,नंदकिशोर मुंदडा,ओमप्रकाश सारडा,डी.एल.जाधव,ग्रंथमित्र व.ग.सूर्यवंशी,आदिंची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ.काळे म्हणाले की, ग्रामीण भागातला शेतकरी गाई म्हशींना अधिक दुध मिळावे म्हणून हिरवा चारा घालतो, तसे सार्वजनिक ग्रंथालयात काम करणार्यांनी ग्रंथालये आपणाला लाभ देणारे उपक्रम आहेत,त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा,वाचकांना केवळ वृत्तपत्रे पुरवून,ग्रंथ देवघेव करत बसण्यापेक्षा या क्षेत्राचा विकास करुन ती गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी ग्रंथालयीन कर्मचार्यांनी प्रयत्न करावा, ग्रंथालयाचा दर्जा बदल,कर्मचार्यांना किमान वेतन,अनुदान वाढ या प्रश्नावर आपण या अधिवेशनात आवाज उठव, त्यासाठी ग्रंथालय संघटनांनी अधिवेशन आंदोलन करावे असेही सुचित केले. माजी आ.गंगाधर पटणे यांनी कोणतेही प्रश्न आमदारांनी विधीमंडळात मांडल्याशिवाय ते सुटू शकत नाही,गेली सतरा वर्षात अनुदान वाढ झालेली नाही,असे सांगून,आ.विक्रम काळे यांनी विधीमंडळात ग्रंथालयाचे प्रश्न मांडावेत अशी




विनंती केली.ग्रंथमित्र राम मेकले यांनी ग्रंथालय चळवळ वृध्दिंगत करण्यासाठी आ.विक्रम काळे यांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

तर गावोगावी ग्रंथालय चळवळ पोहोचण्यासाठी आणि कर्मचार्यांचे प्रश्न मार्गी लागण्यासाठी आ.नमिता मुंदडा यांच्या सहकार्याने प्रयत्न करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांनी सांगितले.ग्रंथमित्र मंठेकर यांनी सत्काराला उत्तर दिले.आजी आ.संयज दौंड यांनीही शुभेच्छा दिल्या.

गेली साठ वर्षांपासून राज्यातली ग्रंथालय चळवळ दुर्लक्षित राहिलेली आहे. आर्थिक समस्या आणि वाढत्या महागाईमुळे काही कर्मचार्यांनी आत्महत्या केल्या आहेत.अनेक वर्षांपासून काम करणार्या या कर्मचार्यांना सन्मानाने जगण्याएवढेही मानधन मिळत नाही.या प्रश्नासाठी विधीमंडळातील जवळपास अर्ध्या आमदारांचे उंबरठे झिजवले पण न्याय मिळत नाही,बहुतांशींनी डोळेझाकच केलीय,अशी खंत व्यक्त करुन,आ.विक्रम काळे यांनी वाचन संस्कृतीला शासनाकडून बळ मिळण्यासाठी आम्हाला मदत करावी,उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अगवत करावे,आम्हीही त्याची उत्तराई करु असा शब्द अध्यक्षीय समारोपात दिला.

या सत्राचे प्रास्ताविक बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुधीर चाटे यांनी केले.

प्रारंभी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमापूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.मान्यवरांच्या यथोचितस्वागतानंतरसहाय्यकग्रंथालयसंचालक सुनील हुसे यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. ग्रंथमित्र मंठेकर यांना मानपत्र देवून,ग्रंथतुला करण्यात आली. नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांना संत तुकडोजी माजी महाराज जीवनगौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.कवी अविनाश भारती,श्रावण गिरी, अर्जून पाटणकर,दत्तात्रय वालेकर, धम्मपाल वैद्य,नरसिंह सूर्यवंशी,प्राचार्य दळवी आदिंचाही शाल,पुष्पहार,ग्रंथभेटदेवूनगौरवकरण्यातआला.

या अधिवेशनासाठी भगवान सारडा,सुरेश टाक,पवन गिरवलकर,प्रभाकर कापसे,ओम सारडा,अङ्गसर पठाण,सोमनाथ शहाणे,डॉ.राहुल धाकडे,हरिदास लोमटे, हावगी बोरकीळे,बाबासाहेब मुंढे, गव्हाणे, महादेव पिंपळे,सुशील मेकले,संतोश करमले,प्राचार्य दि.ना.ङ्गड,शिवाजी सिरसाट, नेताजी देशमुख,गणेश देशमुख,शिवशंकर शेटे,इब्राहिम शेख,मिलींद जोगदंड, सुभाष शेटे,मगन मस्के,रमाकांत चौधरी,विष्णुपंत चाटे, व्यंकटराव पनाळे,सुग्रीव नेहरकर,श्रीहरी कांदे,हरिदास लोमटे, गणेश सगर आदिंनी सहकार्य केले.या अधिवेशनाला मराठवाडा विभागातील ग्रंथालय चालक, ग्रंथालय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुनी पेन्शनसाठी विधानभवनावर धडकणार १० हजार कर्मचारी

लातूर :- नागपूर हिवाळी अधिवेशन-२०२३ मध्ये जुनी पेन्शन योजना राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याच्या मागणीसाठी नागपूर विधानभवनावर १२ डिसेंबर रोजी पेन्शन जनक्रांती महामोर्चा धडकणार आहे. या जनक्रांती महामोर्चासाठी लातूर जिल्हा समन्वय समितीच्या वतीने ६२ संघटनांचे जवळपास १० हजारापेक्षा अधिक कर्मचारी मोठया संख्येने सहभागी होणार असल्याचे समन्वय समितीचे निमंत्रक दीपक येवते यांनी सांगितले. जनक्रांती महामोर्चाच्या नियोजनासाठी जिल्हा शासकीय, निमशासकीय, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बैठक लातूरातील आर्यसमाज मंदिरात पार पडली. या बैठकीस महसूल संघटनेचे अध्यक्ष महादेव पांचाळ, कास्ट्राईब कर्मचारी महासंघ लातूरचे जिल्हा सरचिटणीस अशोक माळगे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, कर्मचारी संघटनेचे ज्येष्ठ नेते विश्वंभर भोसले, कर्मचारी संघटनेचे व्यंकटेश हालिंगे, जुनी पेन्शन संघटनेचे राज्य सहसचिव अरविंद पुलगुरले, जिल्हाध्यक्ष तानाजी सोमवंशी, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनंतराव सूर्यवंशी,मराठवाडा शिक्षक संघटनेचे जी. व्ही. माने, विजयसिंह मोरे, राहुल मोरे यांच्यासह सुमारे ६२ विविध संघटनांचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी अनेक आंदोलने, मोर्चे, धरणे, उपोषणे करण्यात आली. मागील हिवाळी अधिवेशन काळात पेन्शन संकल्प यात्रा काढून राज्य शासनाच्या मागणी निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतरही मार्च महिन्यात राज्यातील १७ लाख कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप करुन जुनी पेन्शन योजनाची मागणी केली होती. शासनाने जुनी पेशन लागू करण्यासाठी समिती स्थापन करुन तीन महिन्यात निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. सहा महिने उलटूनही






शासनाने जुनी पेन्शन योजना लागू केली नाही. या प्रश्नावर बैठकीत चर्चा झाली. तानाजी सोमवंशी यांनी जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालय,शाळा भेट, सोमवारपासून विविध टिम, पॉम्पलेट व वॉल स्टिकर, लढा निधी ५०० , टू व्हिलर व फोर व्हिलर स्टिकर, कर्मचाऱ्यांशी संपर्क,जिल्हा कमिटी व तालुका कमिटी सदस्यांचे नाव व मोबाईल नंबर सर्व ग्रुपवर शेअर करणे, प्रत्येक संघटनेचे तालुकाध्यक्ष हे तालुका कमिटीचे तर जिल्हाध्यक्ष जिल्हा कमिटीचे पदसिद्ध सदस्य राहतील अशा प्रकारे मोर्चा यशस्वीतेसाठी जनजागृती करण्याचे नियोजन केले असल्याचे बैठकीत ठरविण्यात आले. या बैठकीत विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी देखील मार्गदर्शन केले.

## केसीआरचे विमान जमिनीवर

हैदराबाद : वृत्तसंस्था देशव्यापी नेतृत्वाचे स्वप्न तसेच पक्षाचे नाव तेलंगणा व्हाया महाराष्ट्र ते भारत अशी राजकीय वाटचाल सुरू केलेल्या के. चंद्रशेखर राव यांना तेलंगणात मतदारांनी जमिनीवर आणले आहे. तेलंगणात हॅट्ट्रिकच्या तयारीत असलेल्या केसीआर यांना काँग्रेसने रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वात तगडा झटका देत सत्ता खेचून आणली. कर्नाटकात विजय मिळवल्यानंतर काँग्रेसने सर्वाधिक लक्ष तेलंगणात केंद्रीत केले होते. मात्र, देशव्यापी नेतृत्वाचे स्वप्न उराशी बाळगलेल्या केसीआर यांना याची जाणीव नव्हती. उलट महाराष्ट्रातही त्यांनी आपल्या पक्षाचे जाळे पसरविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांचे हे प्रयत्न तेलंगणाच्या जनतेने हाणून पाडले.केसीआर यांनी तेलंगणानंतर सर्वाधिक लक्ष महाराष्ट्रात केंद्रित केले होते. त्यासाठी त्यांनी वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक मीडियाला जाहिरातींचा सपाटा लावला होता. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका लढण्याची तयारीही सुरू केली होती. त्यासाठी सर्व मतदारसंघात त्यांनी निरीक्षकही नेमण्याची सुरुवात केली होती. त्यामुळे बीआरएस महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे गणित बिघडविणार, का असा प्रश्न उपस्थित होऊ लागला होता. मात्र, आता त्यांनाच धक्का बसल्याने महाराष्ट्रातील नेत्यांचे



काय होणार, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मात्र, निवडणुकीअगोदर केसीआरने महाराष्ट्रात दौरे वाढवून महाविकास आघाडीला धक्के देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांचा हा प्रयत्न औटघटकेचा ठरला. धक्कादायक म्हणजे केसीआरला कामारेड्डी मतदारसंघ असलेल्या बालेकिल्ल्यातच भाजपच्या उमेदवाराकडून पराभवाचा सामना करावा लागला.महाराष्ट्रातील नेत्यांचे भवितव्य टांगणीला तेलंगणाच्या सीमेलगतच्या मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात शिरकाव करण्यासाठी शेतकरी चळवळीतील नेते रघुनाथदादा पाटील यांना पक्षात घेतले. तत्पूर्वी शंकरअण्णा धोंडगे हेही पक्षात दाखल झाले होते. याशिवाय राजू शेट्टी यांनाही गळ लावण्याचा प्रयत्न केला होता. तसेच पंढरपूरचे माजी आमदार नाना भालके यांचे सुपुत्र भगीरथ भालके हेही बीआरएसमध्ये दाखल झाले होते. मात्र, केसीआरच बॅकफूटवर आल्याने या नेत्यांचे भवितव्य आता टांगणीला लागले आहे.

# मुख्यमंत्रिपदावरून पुन्हा धुसफूस

भंडारा/मुंबई : प्रतिनिधी राज्यात सत्ताधारी महायुती मजबूत झाली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत महायुती एकतर्फी विजय मिळवू शकेल, असे अंदाज बांधले जातात. परंतु प्रत्यक्षात महायुतीत अंतर्गत मतभेद प्रचंड असल्याची प्रचिती वेळोवेळी येत आहे. भंडारा जिल्ह्यात झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी २०२४ मध्ये देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील, असे कार्यकर्त्यांकडून वदवून घेतले. मात्र, याची वाच्यता होते न होते तोच याबाबतचे पडसाद लगेचच महायुतीत उमटले आणि दुसरीकडे अजित पवार गटाचे प्रवक्ते आ. अमोल मिटकरी यांनी २०२४ मध्ये अजित पवारच मुख्यमंत्री होतील, असा दावा केला. त्यानंतर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी महायुतीत कुणी मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करू नये, असे सांगत अंतर्गत अस्वस्थतेला तोंड फोडले. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप आणि मित्र पक्ष देशात विजयाची पताका फडकविताना दिसत आहेत. त्यामुळे मोदींच्या नेतृत्वाखाली भाजप देशात मजबूत स्थितीत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे राज्या-राज्यांत छोटे-छोटे पक्ष भाजपच्या गळाला लागत आहेत. महाराष्ट्रातही शिवसेना आणि राष्ट्रवादीचे एक-एक गट भाजपसोबत गेले. महाविकास आघाडीला मोठे भगदाड पडल्याने तुलनेने महायुती मजबूत बनली आहे. परंतु महायुतीत सर्व काही आलबेल आहे, असे म्हणता येणार नाही. कारण कोणत्या ना कोणत्या कारणाने अस्वस्थता बाहेर पडत आहे.भाजपच्या ब-याच वरिष्ठ नेत्यांना शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार चालविणे मान्य नाही. परंतु पक्षश्रेष्ठीने घेतलेल्या निर्णयामुळे सर्व नेते मौन बाळगून आहेत. मात्र, आधून-मधून अस्वस्थता बाहेर निघते. पुन्हा फडणवीसच मुख्यमंत्री व्हावेत, अशी अनेकांची इच्छा आहे. त्यामुळे कार्यक्रमात त्याबाबत बोलले जाते. बावनकुळे यांनीही कार्यकर्त्यांसमोर पक्षीय भूमिका मांडताना २०२४ मध्ये फडणवीसच मुख्यमंत्री होतील, असे उपस्थित कार्यकर्त्यांकडून वदवून घेतले. ते म्हणाले की, २०२४ मध्ये मुख्यमंत्रिपदाची शपथ कोण घेणार, त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE